पान १ वरून

## महापुरात ३०० हून अधिक मृत्यू

दिला आहे. हवामान आणि आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञांच्या मते, नेपाळमध्ये परिस्थिती अद्यापही अस्थिर असून पुन्हा एकदा महापूर (सेकंड फ्लड) येण्याची दाट शक्यता आहे. या इशाऱ्यामुळे स्थानिक प्रशासन आणि बचाव पथकांसमोरचे आव्हान अधिकच वाढले असून लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम वेगाने सुरू आहे.

**सीमेवरील भारतीय गावांमध्ये भीती, चिंता**

नेपाळमधील या महापुराचे थेट पडसाद भारतीय सीमेवरील राज्यांमध्येही उमटत आहेत. नेपाळमधून भारतात वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत अचानक मोठी वाढ होण्याची शक्यता असल्याने, उत्तर प्रदेश, बिहार यांसारख्या सीमावर्ती राज्यांमध्ये प्रशासनाने 'हाय अलर्ट' जारी केला आहे. सर्व प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीवर चोवीस तास बारकाईने लक्ष ठेवले जात असून, संभाव्य धोका टाळण्यासाठी भारतीय यंत्रणा सज्ज आहेत.

# ट्रम्प प्रशासनाकडून 'इमिग्रंट व्हिसा' मुलाखतींना तात्पुरती स्थगिती

**वॉशिंग्टन/नवी दिल्ली : अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने जगभरातील सर्व अमेरिकन दूतावास आणि वाणिज्य दूतावासांमधील 'इमिग्रंट व्हिसा' नियुक्त्यांना आणि मुलाखतींना तात्पुरती स्थगिती देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.**

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने स्पष्ट केले आहे की, जगभरातील दूतावास अधिकाऱ्यांसाठी एका नवीन 'ग्लोबल ट्रेनिंग प्रोग्राम'ला सुरुवात करण्यात आली असून, या प्रशिक्षणामुळे व्हिसा मुलाखतींच्या वेळापत्रकात बदल करण्यात आले आहेत. ज्या अर्जदारांच्या मुलाखती यापूर्वीच निश्चित झाल्या होत्या, त्यांना ईमेलद्वारे मुलाखत रद्द झाल्याचे कळवण्यात आले असून, नवीन तारखा नंतर कळवल्या जातील, असे सांगण्यात आले आहे. मात्र, मुलाखती पुन्हा कधी सुरू होतील, याची कोणतीही निश्चित कालमर्यादा अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. हा निर्णय ट्रम्प प्रशासनाच्या व्यापक स्थलांतर धोरणाचा एक भाग मानला जात आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश अधिकाऱ्यांना 'पब्लिक चार्ज' नियमाची कडक अंमलबजावणी करण्यास सक्षम बनवणे हा आहे. याअंतर्गत, अमेरिकेत कायमस्वरूपी वास्तव्यासाठी येणारा अर्जदार भविष्यात अमेरिकन सरकारच्या सार्वजनिक सुविधांवर अवलंबून राहण्याची शक्यता आहे की नाही, याची कसून तपासणी केली जाणार आहे. प्रशासनाचे म्हणणे आहे की, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असलेल्या आणि अमेरिकेच्या साधनसंपत्तीवर ओझे न बनणाऱ्या स्थलांतरितांनाच देशात प्रवेश दिला जावा. याआधी काही दिवसांपूर्वीच एका अमेरिकन फेडरल न्यायाधीशांनी ७५ देशांतील नागरिकांसाठी व्हिसा प्रक्रिया रोखण्याचा ट्रम्प प्रशासनाचा निर्णय बेकायदेशीर ठरवून रद्द केला होता, त्यानंतर लगेचच ही नवी 'स्थगिती' लागू करण्यात आली आहे.

**ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्यांना फटका**

या जागतिक स्थगितीचा सर्वांत मोठा फटका कौटुंबिक आधारावर (फॅमिली बेस्ड) किंवा रोजगाराच्या आधारावर अमेरिकेत कायमस्वरूपी स्थायिक होऊ पाहणाऱ्या म्हणजेच ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्या भारतीय अर्जदारांना बसेल. त्यांच्या व्हिसा प्रक्रियेला आता अनिश्चित काळासाठी विलंब होईल. तसेच, नवीन 'पब्लिक चार्ज' नियमांच्या कठोर छाननीमुळे, ज्या भारतीयांचे उत्पन्न कमी आहे किंवा जे भविष्यात सरकारी मदतीवर विसंबून राहू शकतात असा अधिकाऱ्यांना संशय येईल, त्यांचे व्हिसा नाकारले जाण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढेल. यासोबतच, ट्रम्प प्रशासन एच१-बी व्हिसासाठी कंपन्यांवर एक लाख डॉलर्सपेक्षा जास्त अतिरिक्त शुल्क लादण्याच्या तयारीत आहे, ज्यामुळे भारतीय आयटी क्षेत्रावर आणि कुशल कामगारांवर मोठा दबाव येऊ शकतो.

# अमित ठाकरे यांचा अमित साटम यांच्यावर पलटवार

**नागपूर :** मनसे विद्यार्थी सेनेच्या सदस्य नोंदणी मोहिमेसाठी नागपूर दौऱ्यावर असलेले मनसे नेते अमित ठाकरे यांनी मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांच्यावर त्यांच्याच आक्रमक शैलीत जोरदार पलटवार केला आहे.

राज ठाकरे यांनी अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांच्या मराठी भाषेच्या मुद्द्यावरून भूमिका मांडल्यानंतर, साटम यांनी 'राज ठाकरे यांनी आपल्या नातवाला म्हणजेच अमित ठाकरेंच्या मुलाला मराठीसाठी आधी बालमोहन विद्यालयात दाखल करावे' अशी टीका केली होती. या टीकेला सडेतोड उत्तर देताना अमित ठाकरे म्हणाले की, अमित साटम यांना भुंकायलाच ठेवलंय. ते काम ते उत्तम करत आहेत. तेच त्यांचं काम आहे. पुढे आपला संताप व्यक्त करताना ते म्हणाले, अशा लोकांवर मी काय बोलू, ज्यांना स्वत:च्या भाषेचं, राज्याचं काहीच पडलेलं नाही. अमित साटम म्हणजे तोच ना जो लोकांच्या मृत्यूवर हसला. लोकांवर झाड पडून, खड्ड्यात पडून मृत्यू झाले त्यावर तो हसला, तो माणूस ठरवणार का माझा मुलगा कुठल्या शाळेत जायला पाहिजे? पाचपावली परिसरातील सिंधू महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी हे जळजळीत वक्तव्य केले.

## चुकीच्या डिझाइनमुळे २५० कोटी पाण्यात जाणार; मुंबई मेट्रोची बेफिकिरी!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या 'मेट्रो लाइन ७ ए'च्या कामात प्रशासनाचा आणि सल्लागार कंपन्यांचा अत्यंत निष्काळजीपणा समोर आला आहे. विलेपार्ले पूर्व येथील विमानांच्या उड्डाण आणि लँडिंगचे क्षेत्र असलेल्या 'एअरपोर्ट फनेल झोन'मध्ये बांधण्यात आलेल्या सुमारे १ किलोमीटर लांबीच्या उन्नत पुलाची (एलिव्हेटेड व्हियडक्ट) आणि ओव्हरहेड इलेक्ट्रिक वायरची (ओएचई) उंची भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) ठरवून दिलेल्या सुरक्षेच्या मर्यादेपेक्षा तब्बल २.५ मीटरने अधिक झाली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, या पुलाचे आणि 'एअरपोर्ट कॉलनी' स्थानकाचे जवळपास ९५ टक्के काम पूर्ण झाले असून, आता या गंभीर चुकीमुळे हे संपूर्ण बांधकाम पाडून नव्याने बांधण्याची नामुष्की 'एमएमआरडीए'वर ओढवली आहे. डिझाईनमधील या अक्षम्य चुकीमुळे जनतेच्या कररूपातील तब्बल २५० कोटी रुपये अक्षरशः पाण्यात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

२०२२ मध्ये या प्रकल्पासाठी विमानतळ प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेताना मेट्रोच्या सल्लागार कंपनीने ओव्हरहेड वायरसाठी लागणाऱ्या अतिरिक्त उंचीचा आराखड्यात विचारच केला नसल्याचे आता उघडकीस आले आहे.

विमानांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असल्याने विमानतळ प्राधिकरणाने या अतिरिक्त उंचीला अद्याप परवानगी दिलेली नाही. जर यावर तातडीने कोणताही तांत्रिक तोडगा निघाला नाही, तर हे बांधकाम पाडण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय प्रशासनाकडे उरणार नाही. मुळात २०२१ मध्येच पूर्ण होणे अपेक्षित असलेली ही ३.४ किलोमीटरची महत्त्वपूर्ण मेट्रो मार्गिका आता या बेजबाबदार कारभारामुळे २०२६-२७ नंतरही रखडण्याची चिन्हे आहेत. अधिकाऱ्यांच्या या बेफिकिरीमुळे केवळ आर्थिक नुकसानच होणार नाही, तर प्रवाशांनाही आणखी काही वर्षे गैरसोयीचा सामना करावा लागणार आहे.

## १ सप्टेंबरपासून सर्वसामान्यांच्या खिशावर परिणाम करणारे बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

१ सप्टेंबरपासून देशात सर्वसामान्यांच्या दैनंदिन बजेटशी आणि आर्थिक व्यवहारांशी निगडित अनेक महत्त्वाचे नियम बदलणार आहेत. दर महिन्याच्या १ तारखेप्रमाणे पेट्रोलियम कंपन्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतींचा आढावा घेणार असून, व्यावसायिक आणि घरगुती गॅस दरांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. याचसोबत, गॅस ग्राहकांसाठी 'ई-केवायसी' प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, ती पूर्ण न केल्यास सिलिंडर बुकिंग आणि सबसिडी मिळण्यात अडचणी येऊ शकतात. तसेच, प्राप्तिकर विवरणपत्राशी (आयटीआर) संबंधित प्रलंबित कामे, ऑडिट केसेस आणि ई-व्हेरिफिकेशनच्या नियमांची मुदत संपत असल्याने, करदात्यांनी वेळेत प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्यांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते. दुसरीकडे, बँकिंग क्षेत्र आणि परदेश प्रवासाच्या नियमांमध्येही मोठे बदल पाहायला मिळतील.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस व संबधीतांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नासिक, पोट तुकडी तालुका निफाड पैकी **मौजे डोंगरगांव** गांवचे शिवारातील शेतमिळकती **१) गट नं. २३६/क, क्षेत्र हे. १-५७ आर, आकार रू.२.२९ पैसे २) गट नं.२३६/ब/२, क्षेत्र हे. २ = १० आर, पो.ख.०२ आर, आकार रू.३.४९ पैसे यापैकी क्षेत्र हे.२-०० आर, पो.ख.०२ आर, आकार रू.३.३२ पैसे ३) गट नं.२३६/ब/१, क्षेत्र हे. १-६० आर, आकार रू.२=४८ पैसे यापैकी हे.०-८० आर, आकार रू.१-२४ पैसे** यांसी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे, येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती. त्यातील व त्यावरील जल, तरु, काष्ट, पाषाण वगैरेसह व संपुर्ण हक्कांसह शेतमिळकती **श्री. लक्ष्मण मुरलीधर नागरे,** रा.मु.पो. डोंगरगांव, ता. निफाड, जि. नाशिक यांच्या वडीलोपार्जित मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या आहेत. विक्री व्यवहाराकामी सदर मिळकतीच्या निर्वेधपणा बद्दल खात्रीकरण्यासाठी आम्ही टायटल व्हेरीफिकेशन करीत आहोत.

सदर मिळकतींमध्ये कोणाचेही साठेखत, जनरल मुखत्यारनामा, करारनामा, विसारपावती, लेखी अथवा तोंडी व्यवहार, कब्जा व कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही असे आमचे पक्षकारास सांगितले आहे, असल्यास तशी लेखी हरकत संबधीतांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ **(सात)** दिवसाच्या आत योग्य त्या साक्षांकित कागदपत्रासह आमचे कार्यालयात नोंदवावी. अन्यथा सदर मिळकती संपुर्णता निर्वेध व बोजा रहीत आहे, सदर मिळकतींत कोणाचेही काहीएक हक्क, अधिकार व हितसंबध असल्यास ते त्यांनी कायपस्वरुपी सोडुन दिले आहे असे गृहित धरून सदर मिळकर्तीचा **श्री. लक्ष्मण मुरलीधर नागरे** यांचा मालकीहक्क स्वच्छ, विक्रीयोग्य व वादरहीत आहे, असे समजण्यात येईल, तर नंतर कोणाच्याही कोणत्याही स्वरुपाच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेल्या व संबधीत कागपत्राशिवाय दिलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. केशव केदुजी शिंदे**

**चेंबर नं.२०३/१, निफाड जिल्हा व सत्र न्यायालय आवार, निफाड, ता.निफाड, जि. नासिक.**

## जाहिर नोटीस

तमांम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नासिक पोट तुकडी तालुका निफाड पैकी मौजे सुभाषनगर हद्दीतील शिवारातील शेतमिळकत गट नंबर **127** पैकी क्षेत्र **1** हे. **00** आर., आकार रू. **1.67** पै.हि मिळकत परशराम देवराम डोंगरे व साहेबराव देवराम डोंगरे यांचे मालकीची आहे. हि मिळकत त्यांना विक्री करावयाची असल्याने तसा व्यवहार आमचे पक्षकारा बरोबर निश्चित केलेला असून तसा विसार पावतीचा दस्त दि. **19.8.2026** रोजी नोंदणीकृत केलेला आहे. त्या दस्तावर विसाराची रक्कम डोंगरे यांनी स्विकारलेली आहे. आमचे पक्षकार सदर मिळकत मुदतीत खरेदी करण्यास तयार आहे. परंतु मिळकतीचे मालक हे विसार पावती मध्ये ठरलेल्या अटी शर्तीनुसार मिळकत खरेदी देण्यास हेतुपुरस्करपणे टाळाटाळ करीत आहे व मिळकतीचे मालक सदर मिळकत त्रयस्त इसमास विक्री करण्याचे विचारात आहे.

त्यामुळे या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारा सोबत नोंदणीकृत दस्तान्वये झालेला आहे. त्यामुळे वरील मिळकती बाबत मिळकतीचे मालकांशी विक्री, गहाण, दान अथवा इतर कोणत्याही दस्ताने हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. तसे केल्यास तो व्यवहार आमचे पक्षकारावर बंधनकारक राहाणार नाही. कळावे. ही जाहिर नोटीस. ता. **27.8.2026**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. जयंत दत्तात्रय शिरसाट**

**चेंबर नं. 111 निफाड कोर्ट ता. निफाड, जि. नाशिक. मो-9922360609**

**THIS IS A PUBLIC ANNOUNCEMENT FOR INFORMATION PURPOSES ONLY. THIS IS NOT A PROSPECTUS ANNOUNCEMENT AND DOES NOT CONSTITUTE AN INVITATION OR OFFER TO ACQUIRE, PURCHASE OR SUBSCRIBE TO SECURITIES. THIS PUBLIC ANNOUNCEMENT IS NOT INTENDED FOR PUBLICATION OR DISTRIBUTION, DIRECTLY OR INDIRECTLY OUTSIDE INDIA.**

**CORRIGENDUM: NOTICE TO INVESTORS**

# PHYCHEM TECHNOLOGIES LIMITED

## THE EQUITY SHARES OF THE COMPANY WILL GET LISTED ON SME PLATFORM OF BSE ("BSE SME")

(Please scan this QR Code to view the RHP)

**CIN: U36109MH2013PLC244466**

Our Company was originally incorporated as "Phychem Technologies Private Limited", a private limited company under the Companies Act, 1956, in Maharashtra, Mumbai, pursuant to a Certificate of Incorporation dated June 13, 2013, issued by the Registrar of Companies, Mumbai. Further, by way of a Special Resolution passed by the shareholders at the Extra-Ordinary General Meeting held on August 02, 2025, our Company was converted into a public limited company, and consequently, its name was changed from "Phychem Technologies Private Limited" to "Phychem Technologies Limited". A fresh Certificate of Incorporation consequent upon conversion from private company to public company was issued by the Registrar of Companies, Central Processing Centre, on August 18, 2025. The Corporate Identity Number (CIN) of our Company is U36109MH2013PLC244466. For further details of Incorporation, change of registered office of our Company, please refer to chapter titled ***"History and Corporate Structure"*** beginning on page 135 of the Red Herring Prospectus.

**Registered Office:** Gat No. 172, Khatwad, Dindori, Nashik, Mumbai, Maharashtra, India – 422004
**Contact Person:** Pooja Sharma, Company Secretary & Compliance Officer ; **Tel No:** +91-95187-20873; **E-mail:** cs@phychem.com; **Website:** www.phychem.com

**OUR PROMOTERS: UMAKANT NIVRUTTI SAVADEKAR, ULKA UMAKANT SAVADEKAR, NIVRUTTI SONU SAVDEKAR, VIJAYA NIVRUTTI SAVDEKAR**

## THE ISSUE

**INITIAL PUBLIC OFFER OF UPTO 27,00,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10/- EACH (THE "EQUITY SHARES") OF PHYCHEM TECHNOLOGIES LIMITED ("OUR COMPANY" OR "PTL" OR "THE ISSUER") AT AN ISSUE PRICE OF ₹ [●] PER EQUITY SHARE (INCLUDING SHARE PREMIUM OF ₹[●] PER EQUITY SHARE) FOR CASH, AGGREGATING UP TO ₹[●] LAKHS ("PUBLIC ISSUE") OUT OF WHICH 1,38,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10 EACH, AT AN ISSUE PRICE OF ₹ [●] PER EQUITY SHARE FOR CASH, AGGREGATING ₹ [●] LAKHS WILL BE RESERVED FOR SUBSCRIPTION BY THE MARKET MAKER TO THE ISSUE (THE "MARKET MAKER RESERVATION PORTION"). THE PUBLIC ISSUE LESS MARKET MAKER RESERVATION PORTION I.E. ISSUE OF 25,62,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10 EACH, AT AN ISSUE PRICE OF ₹ [●] PER EQUITY SHARE FOR CASH, AGGREGATING UPTO ₹ [●] LAKHS IS HEREIN AFTER REFERRED TO AS THE "NET ISSUE". THE PUBLIC ISSUE AND NET ISSUE WILL CONSTITUTE 26.37 % AND 25.02 % RESPECTIVELY OF THE POST- ISSUE PAID-UP EQUITY SHARE CAPITAL OF OUR COMPANY.**

**PRICE BAND: ₹51 TO ₹54 PER EQUITY SHARE OF FACE VALUE ₹10/- EACH**

**THE FLOOR PRICE (₹51) IS 5.1 TIMES THE FACE VALUE OF THE EQUITY SHARES AND THE CAP PRICE IS (₹54) 5.4 TIMES OF THE FACE VALUE OF THE EQUITY SHARES. THE PRICE TO EARNING RATIO BASED ON DILUTED EPS FOR FISCAL 2026 AT THE FLOOR PRICE IS (₹51) 9.41 TIMES AND AT THE CAP PRICE (₹54) IS 9.96 TIMES. BIDS CAN BE MADE FOR A MINIMUM OF 4000 EQUITY SHARES AND IN MULTIPLES OF 2000 EQUITY SHARES THEREAFTER**

**Weighted average return on net worth for the last three fiscal years should be read as 28.71%**

**The details of the Fresh Issue and the post-Issue market Capitalisation of the Company, each at the Floor Price (₹51) and the Cap Price (₹54), are given below:**

| Particular | At Floor price of ₹51 per equity share | | At Cap price of ₹54 per equity share | |
|---|---|---|---|---|
| | Up to No of equity Shares of face value of Rs. 10/- each | Up to amount (Rs in Lakhs) | Up to No of equity Shares of face value of Rs. 10/- each | Up to amount (Rs in Lakhs) |
| Fresh Issue | 27,00,000 | 1377.00 | 27,00,000 | 1458.00 |
| Offer for Sale | - | - | - | - |
| **Total Issue Size** | **27,00,000** | **1377.00** | **27,00,000** | **1458.00** |
| Post-Issue Market Capitalization of the Company | **10,240,000** | **5222.40** | **10,240,000** | **5529.60** |

**BID/ ISSUE PROGRAMME**

**ANCHOR INVESTOR BIDDING DATE: FRIDAY, AUGUST 28, 2026**
**BID/ ISSUE OPENS ON: MONDAY, AUGUST 31, 2026**
**BID/ ISSUE CLOSES ON: WEDNESDAY, SEPTEMBER 02,2026^**

*^UPI mandate end time shall be at 05:00 p.m. on the Bid/Issue closing date.*

## ATTENTION INVESTORS
## CORRIGENDUM TO THE RED HERRING PROSPECTUS DATED AUGUST 24, 2026 ("THE CORRIGENDUM")

This corrigendum should be read in conjunction with the Red Herring Prospectus of Phychem Technologies Limited (the "Company") dated August 24, 2026 ("RHP") filed with the Registrar of Companies, the Stock Exchange and the SEBI.

Investors are requested to note the following:

In the Red Herring Prospectus dated August 24, 2026 ("RHP"), the allocation of Equity Shares to Qualified Institutional Buyers ("QIBs"), including the Anchor Investor Portion, Non-Institutional Investors ("NIIs"), and Net QIB Portion at the relevant sections stands corrected as and should be read follows-

**QIB Portion** - not more than 12,72,000 Equity Shares face value of ₹10 each
**Anchor Investor Portion** - upto 7,62,000 Equity Shares face value of ₹10 each
**Non-Institutional Investor Portion** - not less than 3,90,000 Equity Shares of face value of ₹10 each
**Net QIB Portion** - upto 5,10,000 Equity Shares face value of ₹10 each

Accordingly, disclosures relating to the allocation of Equity Shares in the chapters titled ***"Definitions and Abbreviations"*** on page 1, ***"The Issue"*** on page 43, and ***"Issue Structure"*** on page 265 of the RHP, shall be read as amended and substituted with the revised details set out as above.

**Note:** The Red Herring Prospectus shall be read in conjunction with this Corrigendum. The information specified in this Corrigendum supersedes the information in the Red Herring Prospectus to the extent inconsistent with the information already specified therein. The Red Herring Prospectus accordingly stands amended to the extent stated herein.

Unless otherwise specified, all capitalized terms used herein shall have the same meaning ascribed to such terms in the RHP. For further details, please refer to the Red Herring Prospectus.

*The information in this corrigendum supplements and updates the information in the Red Herring Prospectus, as applicable, and the aforementioned changes are to be read in conjunction with the Red Herring Prospectus. Accordingly, appropriate references in the Red Herring Prospectus stand updated pursuant to this corrigendum. Unless further updated, there will be suitable updating in the Prospectus, as and when they are filed with the RoC, the SEBI and the Stock Exchange.*

**DISCLAIMER CLAUSE OF SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA ("SEBI"):** Since the Issue is being made in terms of Chapter IX of the SEBI (ICDR) Regulations, 2018. The Red Herring Prospectus has been filed with SEBI. In terms of the SEBI Regulations, the SEBI shall not issue any observation on the Issue Document. Hence there is no such specific disclaimer clause of SEBI. However, investors may refer to the entire Disclaimer Clause of SEBI beginning on page 245 of the Red Herring Prospectus.

**DISCLAIMER CLAUSE OF BSE ("BSE SME") (THE DESIGNATED STOCK EXCHANGE):** It is to be distinctly understood that the permission given by BSE Limited ("BSE") should not in any way be deemed or construed that the contents of the Prospectus or the price at which the equity shares are offered has been cleared, solicited or approved by BSE, nor does it certify the correctness or completeness of any of the contents of the Prospectus. The investors are advised to refer to the Prospectus for the full text of the 'Disclaimer Clause pertaining to BSE'.

**GENERAL RISK:** Investments in equity and equity-related securities involve a degree of risk and investors should not invest any funds in this Issue unless they can afford to take the risk of losing their investment. Investors are advised to read the risk factors carefully before taking an investment decision in this Issue. For taking an investment decision, investors must rely on their own examination of the Issuer and this Issue, including the risks involved. The Equity Shares have not been recommended or approved by the Securities and Exchange Board of India ("SEBI"), nor does SEBI guarantee the accuracy or adequacy of the contents of the Red Herring Prospectus. Specific attention of the investors is invited to ***"Risk Factors"*** on page 21 of the Red Herring Prospectus.

| BOOK RUNNING LEAD MANAGER TO THE ISSUE | REGISTRAR TO THE ISSUE | COMPANY SECRETARY AND COMPLIANCE OFFICER |
|---|---|---|
| Hem Securities | MUFG MUFG Intime | |
| **HEM SECURITIES LIMITED**<br>**Address:** 904, A Wing, Naman Midtown, Senapati Bapat Marg, Elphinstone Road, Lower Parel, Mumbai-400013, Maharashtra, India.<br>**Tel. No.:** +91- 22- 4906 0000<br>**Email:** ib@hemsecurities.com<br>**Investor Grievance Email:** redressal@hemsecurities.com<br>**Website:** www.hemsecurities.com<br>**Contact Person:** Roshni Lahoti<br>**SEBI Registration Number:** INM000010981<br>**CIN:** U67120RJ1995PLC010390 | **MUFG INTIME INDIA PRIVATE LIMITED**<br>(Formerly Link Intime India Private Limited)<br>**Address:** C-101, Embassy 247, L.B.S. Marg, Vikhroli (West), Mumbai 400 083, Maharashtra, India.<br>**Tel No.:** +91-8108114949<br>**Email:** phychemtechnologies.smeipo@in.mpms.mufg.com<br>**Investor Grievance Email:** phychemtechnologies.smeipo@in.mpms.mufg.com<br>**Website:** www.in.mpms.mufg.com<br>**Contact Person:** Shanti Gopalkrishnan<br>**SEBI Registration Number:** INR000004058<br>**CIN:** U67190MH1999PTC118368 | **Pooja Sharma**<br>**PHYCHEM TECHNOLOGIES LIMITED**<br>Gat No. 172, Khatwad, Dindori, Nashik, Mumbai, Maharashtra, India – 422004<br>Telephone: +91-95187-20873<br>**Email:** cs@phychem.com; **Website:** www.phychem.com<br>**CIN:** U36109MH2013PLC244466<br><br>Investors may contact the Company Secretary and Compliance Officer or the Registrar to the Issue in case of any pre-Issue or post-Issue related grievances including non-receipt of letters of allotment, non-credit of allotted equity shares in the respective beneficiary account, non-receipt of refund orders or non-receipt of funds by electronic mode, etc. For all Issue related queries and for redressal of complaints investors may also write to the BRLMS. |

**All capitalized terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them in the Red Herring Prospectus.**

**On behalf of Board of Directors**
**Phychem Technologies Limited**
**Sd/-**
**Pooja Sharma**
**Company Secretary and Compliance Officer**

**Place:** Nashik
**Date:** August 27, 2026

**Disclaimer-** Phychem Technologies Limited is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public Offer of its Equity Shares the Red Herring Prospectus dated August 24, 2026 has been filed with the Registrar of Companies, Mumbai and thereafter with SEBI and the Stock Exchanges. The Red Herring Prospectus is available on the website of the SEBI at www.sebi.gov.in, website of BSE www.bseindia.com at and is available on the websites of the BRLM at www.hemsecurities.com. Any potential investors should note that investment in equity shares involves a high degree of risk and for details relating to the same, please refer to the Red Herring Prospectus including the section titled ***"Risk Factors"*** beginning on page 21 of the Red Herring Prospectus.

The Equity Shares have not been and will not be registered under the U.S. Securities Act of 1933, as amended (the **"Securities Act"**) or any state securities laws in the United States, and unless so registered, and may not be issued or sold within the United States, except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the Securities Act and in accordance with any applicable U.S. State Securities laws. The Equity Shares are being issued and sold outside the United States in 'offshore transactions' in reliance on Regulation "S" under the Securities Act and the applicable laws of each jurisdiction where such issues and sales are made. There will be no public offering in the United States.